उपसंचालक, आरोग्य सेवा,नाशिक मंडळ, नाशिक यांच्या अधिपत्याखालील २१७३ अस्थायी पदे पुढे चालू ठेवण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक आरोग्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांक:- पीएचडी १६०२७/७४/२०२५ पीएचडी पासु-२ ( कॉम्प्युटर नं-१०५०४०८)**
१० वा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल इमारत,
लोकमान्य टिळक मार्ग, मंत्रालय, मुंबई-४०० ००१.
तारीख:- १६ एप्रिल,२०२६

**वाचा:-**

१) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक:- पीएचडी १६०२७/७४/२०२५ पीएचडी पासु-२, दि.१६.०९.२०२५ ( कॉम्प्युटर नं-१०५०४०८)
२) आरोग्य सेवा आयुक्तालय, पुणे कार्यालय, पुणे यांचे पत्र जा.क्र- ससंआसे/उसआसे नाशिक/अस्थायी पदे २१७३/कक्ष५२ब/न.क्र.८५०/१२३६-३८/२६,दि. ०७.०४.२०२६
३) वित्त विभाग शासन निर्णय क्र.पदनि-२०१६/प्र.क्र. ८/१६/आ.पु.क, दि.२८.०२.२०२६.

**प्रस्तावना:-**

उपसंचालक, आरोग्य सेवा, नाशिक मंडळ, नाशिक यांच्या अधिपत्याखाली असलेल्या आरोग्य संस्थांमधील २१७३ अस्थायी पदांना दि.०१.०९.२०२५ ते दि.२८.०२.२०२६ पर्यंत उपरोक्त संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये देण्यात आलेली मुदतवाढ संपुष्टात आल्याने सदर पदांना पुढे मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

या शासन निर्णयासोबत जोडलेल्या “परिशिष्ट-अ” मध्ये नमूद केलेल्या उपसंचालक, आरोग्य सेवा, नाशिक मंडळ, नाशिक यांच्या अधिपत्याखाली असलेल्या आरोग्य संस्थांमधील २१७३ अस्थायी पदांना दि.०१.०३.२०२६ ते दि.३१.०८.२०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

२. सदर अस्थायी पदांचे वेतन यापूर्वी ज्या लेखाशिर्षातून अदा करण्यात येत आहे, त्याच लेखाशिर्षातून यापुढील वेतन खर्ची करण्यात यावे आणि हा खर्च सन २०२६-२७ या वर्षाकरीता मंजुर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. हा शासन निर्णय वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक, पदनि-२०१६/प्र.क्र.०८/१६/आ.पु.क., दि.२८.०२.२०२६ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक, पदनि-२०१६/प्र.क्र.०८/१६/आ.पु.क., दि.२८.०२.२०२६ अन्वये दि.०१.०३.२०२६ ते दि.३१.०८.२०२६ पर्यंत अस्थाई पदांच्या मुदतवाढीस मान्यता देण्यात आली असली तरी, दरम्यानच्या काळात सुधारीत आकृतीबंधास उच्चस्तरीय सचिव समितीची मान्यता घेण्याबाबत सर्व प्रशासकीय विभागांनी तातडीने प्रस्ताव सादर करण्याबाबत वित्त विभागाने निर्देशित केले आहे. तसेच उपरोक्त संदर्भ क्र.०३ अन्वये वित्त विभागाच्या शासन निर्णयानुसार, अस्थायी पदांना दि.०१.०३.२०२६ ते दि.३१.०८.२०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली असून त्यादरम्यान सुधारीत आकृतीबंधास उच्चस्तरीय सचिव समितीची मान्यता घेण्याकरीता सुधारीत आकृतीबंधाचे प्रस्ताव शासन निर्णय, वित्त विभाग, दिनांक २९ जून,२०१७ नुसार तपासून व त्यानुसार कार्यवाही करुन तातडीने वित्त विभागास सादर करण्याकरीता आयुक्तालय कार्यालयाकडून उचित कार्यवाही करावी व त्याबाबातचा प्रस्ताव शासनास पाठवावा.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०४१६१७००५२४५१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RAJENDRA VITTHAL KUDALE

Digitally signed by RAJENDRA VITTHAL KUDALE
DN: cn=RAJENDRA VITTHAL KUDALE, o, ou, email=Rajendra.Kudale@nic.in, c=IN
Date: 2026.04.16 17:30:11 +05'30'

**(रा. वि. कुडले)**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखा परिक्षा) ( लेखा व अनुज्ञेयता), मुंबई व नागपूर.
२. आयुक्त, आरोग्य सेवा तथा संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
३. संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
४. सहसंचालक, आरोग्य सेवा (रुग्णालये-राज्यस्तर), मुंबई.
५. सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन) मुंबई.
६. उपसंचालक, आरोग्य सेवा, नाशिक मंडळ, नाशिक.
७. जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, नाशिक, धुळे, जळगाव, अहमदनगर, नंदूरबार.
८. जिल्हा कोषागार अधिकारी, नाशिक, धुळे, जळगाव, अहमदनगर, नंदूरबार.
९. वैद्यकीय अधिक्षक, ग्रामीण रुग्णालये, (उपसंचालक, आरोग्य सेवा, नाशिक यांचेमार्फत)
१०. वित्त विभाग (व्यय-१३), मंत्रालय, मुंबई.

११. कार्यासन अधिकारी, सेवा-१/सेवा-२/अर्थसंकल्प, सा.आ.वि. मंत्रालय, मुंबई.

१२. निवडनस्ती (पासु-२)

## परिशिष्ट-अ

(शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांकः- पीएचडी १६०२७/७४/२०२५ पीएचडी पासु-२ (कॉम्प्युटर नं-१०५०४०८), दिनांक-१६ एप्रिल,२०२६सोबतचे परिशिष्ट-अ)

| अ. क्र. | आरोग्य संस्थेचे नाव | अस्थायी पदांची संख्या |
|---|---|---|
| १ | ७८ ग्रामीण रुग्णालये, नाशिक | २१८ |
| २ | ग्रामीण रुग्णालय सिन्नर, जि. नाशिक व भुसावळ, जि.जळगांव | २० |
| ३ | जिल्हा रुग्णालय, नाशिक | १०७ |
| ४ | जिल्हा रुग्णालय, अहमदनगर | ५२ |
| ५ | उपजिल्हा रुग्णालय, त्र्यबंकेश्वर, जि. नाशिक | १६ |
| ६ | ५० खाटांचे १० उपजिल्हा रुग्णालये- निफाड, मनमाड, चांदवड, दोंडाईचा, जामनेर, नवापूर, तळोदा, मुक्ताईनगर, कर्जत व पाथर्डी | ४० |
| ७ | कुटीर रुग्णालय, पारोळा, जि.जळगाव | ३० |
| ८ | ग्रामीण रुग्णालय, निजामपुर-जैताणे, जि.धुळे व ग्रामीण रुग्णालय, नटावद जि.नंदूरबार | ५० |
| ९ | सामान्य रुग्णालय मालेगाव, जि. नाशिक | २७४ |
| १० | १०० खाटांचे ३ उपजिल्हा रुग्णालये- कळवण , शिरपूर व चोपडा | ३७ |
| ११ | जिल्हा रुग्णालय, जळगांव | ७३ |
| १२ | विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, नाशिक | ६१ |
| १३ | विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, नाशिक | ३६७ |
| १४ | जिल्हा स्त्री रुग्णालय,धुळे | ६८ |
| १५ | जिल्हा रुग्णालय,जळगाव (अतिरीक्त खाटा) | ४८ |
| १६ | नवनिर्मित ग्रामीण रुग्णालय, सावदा, जि.जळगाव | १० |
| १७ | औषध निर्माण अधिकाऱ्यांचे पुनर्निर्मित करण्यात आलेले जळगाव जिल्हयातील धरणगाव, बोदवड,रावेर व अंमळनेर | ४ |

| अ. क्र. | आरोग्य संस्थेचे नाव | अस्थायी पदांची संख्या |
|---|---|---|
| १८ | जिल्हा रुग्णालय, धुळे | १३७ |
| १९ | सामान्य रुग्णालय, नंदुरबार | २७८ |
| २० | उपसंचालक, आरोग्य सेवा, नाशिक मंडळ, नाशिक यांचे कार्यालय | २० |
| २१ | फिरते देखभाल पथक, जिल्हा रुग्णालय, अहमदनगर | ३५ |
| २२ | नवनिर्मित ट्रामा केअर युनिट, इगतपुरी, जि.नाशिक / भुसावळ, जि.जळगांव / संगमनेर, जि.अहमदनगर | २४ |
| २३ | जिल्हा स्त्री रुग्णालय, नंदुरबार | ६८ |
| २४ | नवनिर्मित स्त्री रुग्णालय, मालेगाव, जि.नाशिक | ४२ |
| २५ | नवनिर्मित स्त्री रुग्णालय, जळगांव, जि.जळगांव | ४२ |
| २६ | नवनिर्मित स्त्री रुग्णालय, अहमदनगर | ४२ |
| २७ | ग्रामीण रुग्णालय, पिंपळगाव बसवंत, जि.नाशिक | १० |
| | **नाशिक मंडळातील एकूण अस्थायी पदे** | **२१७३** |